Times of India
9 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SRPD workshops from Thursday at SUK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) is conducting workshops for its affiliated colleges for the Secured Remote Paper Delivery (SRPD) scheme from Thursday onwards. According to SUK officials, they are going to introduce few more subjects in the present line-up of over 2,600 subjects under SRPD. A morning session workshop will be organised at the Mathubai Garware Kanya Mahavidyalaya in Sangli. The Kolhapur district will be conducting the workshop at Shahaji Law College in the afternoon session.

An SUK official said, "For Satara district, the workshop will be conducted on March 10 at the Chhatrapati Shivaji College in Satara city. Principals of affiliated collges along with two officials from the exam department must remain present for the workshop."

Earlier Mahesh Kakade, controller of examinations (CoE), SUK, said that from the March 2017, semester examination of new subjects like Bachelor of Vocational Education (BVoc) and the ones from Commerce stream will be added to the SRPD system. Under SRPD, the examination department can send the concerned papers directly to the concerned examination centres in an encrypted format through online mode." TNN

पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
- 9 MAR 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पांडुरंग मोरे यांना बेस्ट पेपर ॲवॉर्ड

**जयसिंगपूर/ प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या वतीने आयोजित केलेल्या नॅशनल कॉन्फरन्स मल्टी डिस्पलिनरी ट्रेटस् अँड टेक्नॉलॉजी या राष्ट्रीय परीक्षेमध्ये संजय घोडावत इन्स्टियूटचे प्रा.पांडुरंग मोरे यांनी सादर केलेल्या सोलर विंड हायब्रीड मॉडेल या पेपरला 'बेस्ट पेपर' सन्मान मिळाला आहे. या कार्यक्रमाला डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. बागी, डॉ.पी. डी. पाटील, पी. सी. भास्कर आदी उपस्थित होते. ॲवॉर्ड मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

9 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. किरवले यांना विद्यापीठात आदरांजली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. कृष्णा किरवले यांच्या निधनामुळे मराठी दलित साहित्याचा एक साक्षेपी संशोधक व निष्ठावान आंबेडकरी विचारवंत हरपला, अशा शब्दांत त्यांना आदरांजली वाहण्यात आली. शिवाजी विद्यापीठात बुधवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ. यू. ए. अरविंदेकर, शंकरराव कुलकर्णी, डॉ. निशा मुडे-पवार, वसंतराव मगदूम, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एस. आर. यादव आदींनी भावना व्यक्त केल्या. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्ताव मांडला.

लोकमत
9 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे बुधवारी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋचा पुजारी हिच्या प्रमुख उपस्थितीत 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. यावेळी डावीकडून डॉ. ए. के. साहू, जयदीप बागी, शरद पोवार उपस्थित होते.

# यशासाठी स्वयंप्रेरणा, अपूर्व मनोबलावर कार्यरत राहा

## ऋचा पुजारी : तंत्रज्ञान विभागाचा कार्यक्रम

कोल्हापूर : आयुष्यातील प्रत्येक दिवशी अंगभूत क्षमतांचा सुयोग्य वापर करून दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वयंप्रेरणा, अपूर्व मनोबलाच्या जोरावर सतत कार्यरत राहिल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋचा पुजारी हिने बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात ऋचा बोलत होती. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी प्रमुख उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू पुजारी म्हणाली, बौद्धिक, शारीरिक व भावनात्मक यापैकी कुठल्याच पातळीवर महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. महिलांनी सर्वच क्षेत्रांत विविध आघाड्यांवर सर्वदूर प्रगती केली आहे. त्यामुळे प्रत्येक दिवस हा महिला दिनच आहे. संचालक डॉ. बागी म्हणाले, महिलांनी स्वत:वरील बंधने झुगारून, काळाची गरज ओळखून प्रगत तंत्रज्ञान अवगत करून घौडदौड सुरु ठेवावी. कार्यक्रमात तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनींना लक्ष्य ग्रुपचे प्रशिक्षक शरद पोवार यांनी आत्मसंरक्षणाचे धडे दिले. यावेळी रश्मी देशमुख, अमृता मांजरेकर, रुपाली धाबर्डे, वर्षा पाटील, पूनश्री फडणीस, आदी उपस्थित होत्या. (प्रतिनिधी)

9 MAR 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Zero budget film from city to Cannes

Piysuh.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Umesh Bagade made 'Chaukat' with zero budget but the 11-minute film has made it big. It has reached all the way to the coveted Festival de Cannes in France.

The filmmaker said they received confirmation from the Cannes authorities about the selection of the film earlier this week. "It has been selected in the 'short film corner' of the festival to be held in May. 'Chaukat (Frame)' has won many national and international laurels and was screened in the International Film Festival of India last year," he said.

"This 11-minute film was made on zero budget. Whatever expenses we have made are for a few technical things. It would come to less than Rs 10,000," he said. Shot in the early 2016 on the outskirts of the city, the message of 'Chaukat' is simple — "if people can see God in stone idols, they should also search for God in every human being and respect him or her", Bagade said.

TOI



Tthe 11-minute film 'Chaukat' has made to the coveted Festival de Cannes in France

"The selection of this film is a perfect tribute to our entire team and also for actor Vijay Pawar, who died of cardiac arrest in January," he said. "Pawar sir did not charge a penny from us and came up with a stellar performance. It saw many awarc and nominations in nationa festivals," Bagade said.

Saurabh Prabhudesai, ec tor of the film, said all aspects the film, including acting, pr duction, direction, editing, scr enplay and camera, have bee done by artists from Kolhapu "We need to nurture talents ir Kolhapur. We hope this success gives inspiration to all budding filmmakers in the city," he said

"The short film corner a Festival de Cannes will be a gre at platform for us. We can show case our stories to the produc tion houses visiting the festival and look for financial prospects for future projects," Prabhudesai said. 'Chaukat' was screened at festivals such as River to River Florence Indian Film Festival. It has so far won 24 awards, including the Best Film award.

- 9 MAR 2017 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चित्रपट हे विश्व संस्कृती समजून घेण्याचे माध्यम'

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**चित्रपट हे** विश्व संस्कृती समजून घेण्याचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांची दृष्टी विकसित करण्यासाठी, त्यांची विवेकी मानसिक घडण होण्यासाठी ते अतिशय प्रभावी शैक्षणिक साधन आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी बुधवारी केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्त विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाचा दृष्टी उपक्रम व दक्षिणायन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

चित्रपट पाहताना माणूस दृश्य आणि त्यामागील कथन यांचा गंभीरपणे विचार करायला शिकत जातो, असा उल्लेख करून डॉ. गवस म्हणाले, समाज अत्यंत निर्मल व्हायचा असेल, तर आपली मने निर्मल व्हायला हवीत. त्यासाठी जगभरातील सशक्त, सकारात्मक आशयप्रधान चित्रपट आपल्याला मदत करतील. या जगात लोकशाही तत्त्व जपणारा, लिंगभेद नाकारणारा हिंसामुक्त अवकाश निर्माण करायचा असेल, तर आपण परिघाबाहेरचे, अन्यायाच्या विरोधात लढ्याची प्रेरणा देणारे परक्या भाषा व संस्कृतीचे चित्रपट पहिले पाहिजेत.

विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविकात या चित्रपट महोत्सवाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. कोणतीही भाषा शिकत असताना त्या भाषेची संस्कृती समजून घेणे आवश्यक असते. त्यासाठी चित्रपट हे अत्यंत प्रभावी मध्यम आहे. म्हणूनच दृष्टी उपक्रमातून अनेक उत्तम दर्जाचे आशयसंपन्न चित्रपट विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शित केले जातात. या वर्षी समाजात विविध स्तरांवर संघर्ष करणाऱ्या महिलांच्या लढ्याची गाथा मांडली जात आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पहिल्या दिवशी स्मिता पाटील व नसिरुद्दीन शाह अभिनित 'मिर्च मसाला' या चित्रपटाचे प्रदर्शन झाले. त्यास विद्यार्थी व शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र टाईम्स
- 9 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चित्रपट हे संस्कृती समजून घेण्याचे माध्यम'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'चित्रपट हे जागतिक संस्कृती समजून घेण्याचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांची दृष्टी विकसित करण्यासाठी, त्यांची विवेकी मानसिकतता घडवण्यासाठी ते अतिशय प्रभावी साधन आहे. चित्रपट पाहताना माणूस दृश्य आणि त्यामागील कथन यांचा गंभीर विचार करायला शिकत जातो. समाज अत्यंत निर्मळ व्हायचा असेल तर मने निर्मळ व्हायला हवीत. त्यासाठी जगभरातील सशक्त, सकारात्मक आशयप्रधान चित्रपट आपल्याला मदत करतील,' असे मत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागाचे विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

जागतिक महिला दिनानिमित्त विदेशी भाषा विभागाचा 'दृष्टी उपक्रम दक्षिणायन' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रसंगी बोलत होते.

डॉ. गवस म्हणाले, 'मानवी जीवनावर चित्रपटांचा नेहमीच प्रभाव राहिला आहे. चित्रपटाच्या माध्यमातून व्यक्ती गंभीरपणे विचार करण्यास प्रवृत्त होतो. जगात लोकशाही तत्त्व जपणारा, लिंगभेद नाकारणारा हिंसामुक्त अवकाश निर्माण करायचा असेल तर आपण परिघाबाहेरचे, अन्यायाविरोधात लढ्याची प्रेरणा देणारे परक्या भाषा व संस्कृतीचे चित्रपट पहिले पाहिजेत. अशावेळी चित्रपट महोत्सव सहायभूत ठरतील.'

'यावर्षी समाजात विविधस्तरांवर संघर्ष करणाऱ्या महिलांच्या लढ्याची गाथा मांडली जात आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविकांमध्ये केले. पहिल्या दिवशी स्मिता पाटील व नसिरुद्दीन शहा अभिनित 'मिर्च मसाला' या चित्रपट दाखवण्यात आला.

9 MAR 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपट हे विश्वसंस्कृती समजून घेण्याचे माध्यम

## डॉ. राजन गवस : शिवाजी विद्यापीठात चित्रपट महोत्सव

कोल्हापूर, ता. ८ : चित्रपट हे विश्वसंस्कृती समजून घेण्याचे माध्यम असल्याचे मत, साहित्यिक प्रा. डॉ. राजन गवस यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाचा दृष्टी उपक्रम व दक्षिणायन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. पहिल्या दिवशी स्मिता पाटील व नसिरुद्दीन शहा अभिनित 'मिर्च मसाला' हा चित्रपट दाखवण्यात आला. त्यास विद्यार्थी व शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मराठी अधिविभागाने संयोजन केले.

डॉ. गवस म्हणाले, "विद्यार्थ्यांची दृष्टी विकसित करण्यासाठी, त्यांची विवेकी मानसिक घडण होण्यासाठी चित्रपट हे अतिशय प्रभावी शैक्षणिक साधन आहे. चित्रपट पाहताना माणूस दृश्य आणि त्यामागील कथन यांचा गंभीरपणे विचार करायला शिकत जातो. समाज जर अत्यंत निर्मल व्हायचा असेल, तर आपली मने निर्मल व्हायला हवीत. त्यासाठी जगभरातील सशक्त, सकारात्मक आशयप्रधान चित्रपट आपल्याला मदत करतील. या जगात लोकशाही तत्व जपणारा, लिंगभेद नाकारणारा हिंसामुक्त अवकाश निर्माण करायचा असेल, तर आपण परिघाबाहेरचे, अन्यायाच्या विरोधात लढ्याची प्रेरणा देणारे परक्या भाषा व संस्कृतीचे चित्रपट पाहिले पाहिजेत."

विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरेंनी प्रास्ताविक केले.

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
9 MAR 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कार्यकारिणीवर पी. आर. फराकटे

**मुरगूड / प्रतिनिधी :** येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. पी. आर. फराकटे यांची शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास परिषदेच्या कार्यकारिणीवर निवड झाली.



प्रा. फराकटे

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद अधिवेशन नुकतेच रुकडी येथे झाले. या अधिवेशनात सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातून इतिहास विषयाचे प्राध्यापक आले होते. त्यावेळी सन २०१७ ते २०२१ या कालावधीकरिता शिवाजी विद्यापीठाची इतिहास विषयाची कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये फराकटे यांची निवड करण्यात आली. निवडीबद्दल संस्थेचे सेक्रेटरी प्रा. संजय मंडलिक, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार व प्राध्यापकवर्गाने त्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
9 MAR 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

थोडक्यात महत्त्वाचे

# अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी डॉ. लंगरेंची निवड



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील सहयोगी प्रा. डॉ. चंद्रकांत लंगरे यांची अमेरिकेतील नॉर्थ इस्ट मॉडर्न लँग्वेज असोसिएशनने जॉन हॉपकिन्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड केली आहे. हे चर्चासत्र २३ ते २६ मार्च या कालावधीत आयोजित केले आहे. प्रा. लंगरे हे 'कन्स्ट्रक्टिंग इंडियन नॅशनल आयडेंटिटी इन फिल्म्स ॲण्ड लिटरेचर' या विशेष सत्रात 'द पोर्ट्रेयल ऑफ द मार्जीनलाईज्ड पीपल इन द फिल्म्स ऑफ श्याम बेनेगल' या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. यापूर्वी त्यांनी अमेरिका, इटली आणि इंग्लंड येथील नामवंत विद्यापीठांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर मार्गदर्शन लाभले..

सकाळ जनसंपर्क कक्ष
.9 MAR 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दृष्टिक्षेपात जिल्हा

# अमेरिकेतील चर्चासत्रासाठी डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड


डॉ. लंगरे

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत आ. लंगरे यांची अमेरिकेतील नॉर्थइस्ट मॉडर्न लँग्वेज असोसिएशन, जॉन हॉपकिन्स विद्यापीठात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. ते कन्स्ट्रक्टिंग इंडियन नॅशनल आयडेंटीटी इन फिल्म्स अँन्ड लिटरेचर या विशेष सत्रात पोर्ट्रेयल ऑफ द मार्जीनलाइज्ड पीपल इन द फिल्म्स ऑफ श्याम बेनेगल या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह इंग्रजी अधिविभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

महाराष्ट्र टाईम्स
9 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. लंगरे यांची निवड



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांची अमेरिकेतील नॉर्थइस्ट मॉडर्न लँग्वेज असोसिएशन यांनी जॉन हॉपकिन्स विद्यापीठात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. ते 'कन्स्ट्रक्टिंग इंडियन नॅशनल आयडेंटीटी इन फिल्म्स अँड लिटरेचर' या विशेष सत्रात 'द पोर्ट्रेयल ऑफ द मार्जीनलाइज्ड पीपल इन द फिल्म्स ऑफ श्याम बेनेगल' या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. हे चर्चासत्र २३ ते २६ मार्चमध्ये होणार आहे. डॉ. लंगरे यांनी यापूर्वी अमेरिका, इटली आणि इंग्लंड येथील चर्चासत्रांत शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

- 9 MAR 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांची अमेरिकेतील नॉर्थइस्ट मॉडर्न लँग्वेज असोसिएशन यांनी जॉन हॉपकिन्स विद्यापीठात २३ ते २६ मार्च या कालावधीत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. ते या चर्चासत्रता शोधनिबंध सादर करणार आहेत. यापूर्वी त्यांनी अमेरिका, इटली आणि इंग्लंड येथील नामवंत विद्यापीठांमध्ये आयोजित केलेल्या चर्चासत्रात शोधनिबंध सादर केले आहेत.

तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
9 MAR 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्रश्न पाण्याचा' विषयावर विद्यापीठात १७ रोजी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग व डॉ. जे.एफ. पाटील अमृतमहोत्सव सत्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर १७ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी.एस.कांबळे असणार आहेत. १७ रोजी दुपारी १२ वाजता अर्थशास्त्र सेमीनार हॉलमध्ये हे व्याख्यान होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून बेळगाव येथील प्राचार्य आनंद मेणसे उपस्थित राहतील. यावेळी प्रा.डॉ. जे. एफ.पाटील, डॉ. अर्जुनराव महाडिक, डॉ.पी.बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, प्रा.सुभाष दगडे, प्रा.डॉ. आर.जी.दांडगे, प्रा. डॉ.व्ही.बी.ककडे, प्रा. डॉ. एम.एस.देशमुख, डॉ. सौ. व्ही.पी.कट्टी, एस.टी.कोंबडे, एस.पी.पंचगल्ले यांच्यासह अर्थशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
9 MAR 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्रश्न पाण्याचा' विषयावर आज व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग आणि डॉ. जे. एफ. पाटील अमृतमहोत्सव सत्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रश्न पाण्याचा' विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. व्याख्यान गुरुवार, ९ मार्च रोजी दुपारी १२.१५ वाजता अर्थशास्त्र सेमिनार हॉलमध्ये होणार आहे. व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य आनंद मेणसे असणार आहेत, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे आहेत.

महाराष्ट्र टाईम्स
9 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग आणि डॉ. जे. एफ. पाटील अमृत महोत्सवी सत्कार समितीच्या संयुक्त विद्यमाने 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर विशेष व्याख्यान गुरुवारी (ता. ९) दुपारी १२ वाजता होणार आहे. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये कार्यक्रम होणार आहे. प्राचार्य आनंद मेणसे 'प्रश्न पाण्याचा' विषयावर विचार मांडणार आहेत. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे असतील. यावेळी जेष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. अर्जुनराव महाडिक, डॉ. पी. बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, प्रा. सुभास दगडे, प्रा. डॉ. आर. जी. दांडगे, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. व्ही. पी. कट्टी, एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले उपस्थित राहणार आहेत.

लोकमत
9 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थशास्त्र विभागातर्फे आज विशेष व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग आणि डॉ. जे. एफ. पाटील अमृत महोत्सव सत्कार समितीतर्फे आज, गुरुवारी दुपारी बारा वाजता 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. विद्यापीठातील अर्थशास्त्र सेमिनार हॉलमध्ये होणाऱ्या व्याख्यानात बेळगावचे प्राचार्य आनंद मेणसे मार्गदर्शन करतील. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. अर्जुनराव महाडिक, पी. बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, प्रा. सुभाष दगडे, आर. जी. दांडगे, व्ही. बी. ककडे, आदी उपस्थित असतील. पाण्याचे वाटप, त्याचा उपभोग व वापर कशा पद्धतीने केला जावा की त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती व पर्यायाने शाश्वत विकास साध्य करता येईल, याबाबतचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.